**शासन अनुदानित व खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस अभ्यासक्रम पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शासनाची बंधपत्रित सेवा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

**शासन निर्णय क्र. एमईडी १०१६/प्र.क्र.३४५/१६/शिक्षण-२,**

नववा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, नविन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.

**दिनांक : ०५ जानेवारी, २०१८.**

**संदर्भ**

१. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी-१००७/ प्र.क्र.४९०/०७/ शिक्षण-२, दिनांक ०८.०२.२००८.

२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी-१०१३/ प्र.क्र.१०१/१३/ शिक्षण-२, दिनांक ३१.०१.२०१४.

३.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी १०१७/ प्र.क्र.१७१/ १७/ शिक्षण-२, दिनांक १२.१०.२०१७ व दिनांक २४.११.२०१७

<u>प्रस्तावना</u> :

राज्यातील शासकीय आणि महापालिका वैद्यकीय/ दंत महाविद्यालयातून वैद्यकीय/ दंत पदवी/ पदव्युत्तर पदविका/ पदव्युत्तर पदवी/ अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमाकरीता एक वर्ष कालावधीची शासनाची बंधपत्रित सेवा पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे वैद्यकीय सेवा देण्याकरीता शासनास बऱ्याच प्रमाणात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होतात. तथापि, राज्यातील ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागामध्ये वैद्यकीय सेवा पुरविण्यास अजुनही पुरेसे डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. तसेच, आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडून अनुक्रमे अनुसुचित जमाती व अनुसुचित जाती या संवर्गातील खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या १०० टक्के रकमे एवढी शिष्यवृत्ती अदा करण्यात येते. तसेच ,विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या संवर्गातील खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण

शुल्काच्या १०० टक्के व इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रकमेएवढी शिष्यवृत्ती अदा करण्यात येते.

खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना देखील शिक्षण शुल्काच्या ५०टक्के रकमेची वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत प्रतिपुर्ती करण्यात येते. तसेच, शासन अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून देखील शासकीय महाविद्यालयांप्रमाणेच अत्यंत माफक स्वरुपात शुल्क आकारले जाते. शासनाच्या विविध विभागाकडुन वैद्यकीय पदवी (एमबीबीएस) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती/शिष्यवृत्ती याचा खर्च राज्यातील जनतेच्या पैशातुन केला जातो. सदर खर्चाची काही अंशी परतफेड व्हावी व राज्यातील ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागामध्ये वैद्यकीय सेवा पुरविण्यास पुरेसे डॉक्टर्स उपलब्ध व्हावे या अनुषंगाने राज्यातील शासन अनुदानित आणि खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना एमबीबीएस अभ्यासक्रमाकरीता शासनाची शिष्यवृत्ती/प्रतिपुर्ती प्राप्त होते अशा विद्यार्थ्यांना शासनाची एक वर्षाची बंधपत्रित सेवा करणे बंधनकारक करण्याबाबत निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे .

**<u>शासन निर्णय:-</u>**

राज्यातील शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस अभ्यासक्रमाचे जे विद्यार्थी आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या विविध शिष्यवृत्ती/प्रतिपुर्ती योजनेचा लाभ घेतात अशा सर्व विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पुर्ण झाल्यांनतर शासनाची एक वर्षाची बंधपत्रित सेवा करणे बंधनकारक राहील.

२. बंधपत्रित सेवेची वरील अट ही सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून वैद्यकीय पदवी (एमबीबीएस) अभ्यासक्रमास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

३. शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस अभ्यासक्रमाचे जे विद्यार्थी आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण

विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या कोणत्याही शिष्यवृत्ती/प्रतिपुर्ती योजनेचा लाभ न घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर बंधपत्रित सेवा बंधनकारक राहणार नाही.

४. बंधपत्रित सेवा करणे आवश्यक असलेल्या उमेदवारांनी जर त्यांना वाटप करण्यात आल्यानुसार वैद्यकीय सेवा पुरविण्यात कसूर केल्यास संबधित उमेदवारांना शासनाकडून शिष्यवृत्ती/प्रतिपुर्ती स्वरुपात प्राप्त शुल्काची रक्कम ही व्याजासह शासनास परत करणे आवश्यक राहील. या व्यतिरिक्त बंधपत्रित सेवेबाबत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना ज्या अटी /शर्ती लागू आहेत, त्या अटी/शर्ती वरील उमेदवारांनासुध्दा लागू होतील.

५. वरीलप्रमाणे उपलब्ध होणाऱ्या बंधपत्रित उमेदवारांना बंधपत्रित सेवा वाटप करण्याबाबत व अनुषंगीक कार्यवाही संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आणि संचालक, आरोग्य सेवा यांच्यामार्फत करण्यात येईल .

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०५११५६१७४७१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, serialNumber=f0abc250c4d9be2b6b786fa7056a78c0298ba36e78a4582723738fdd3d550d44, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2018.01.05 17:06:17 +05'30'

**(सुरेन्द्र प्र. चानकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुबंई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व सह/ उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विजाभज इमाव व विमाप्र, पुणे.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा संचालनाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
अधिष्ठाता/ प्राचार्य, महात्मा गांधी इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस, सेवाग्राम, वर्धा.
अधिष्ठाता/ प्राचार्य सर्व खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालये.
निवडनस्ती (शिक्षण-२).